जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.०३/०७/२०२३**
**दि.०२/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४२/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५१ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०७/२०२३ रोजी रात्री १२/२० वा.रेड्डी बार अॅन्ड हॉटेल समोर,सादलबाबा चौक,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून पाठीमागुन त्यांचे जवळ येवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ४०,०००/- रूपये किंचीचे जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोबांळे ९८२३५५६७१३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २६८/२०२३,भादविक ३२३,३२४,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.म्हाडा वसाहत,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०७/२०२३ रोजी रात्री ०९/३० वा.फ्लॅट नं.५०१,ए-बिल्डींग,म्हाडा सोसायटी,वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे सासरे राहत असलेल्या सोसायटीचा मेंटेंनन्स गोळा करण्याचे काम करतात. सदर इसमांनी फिर्यादीचे सासरे यांचे घरी येवुन,त्यांना राहते सोसायटीचा तात्काळ मेंटेंनन्स देण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी पगार झाल्यानंतर मेंटेंनन्स देतो असे सांगितल्याचा राग मनात धरुन त्यांनी फिर्यादी यांचे सासरे यांना शिवीगाळ करुन,त्यांना दगडाने नाकावर व मानेवर मारहाण केली. तसेच फिर्यादी यांचे मुलास हातात बांबु घेवुन मारण्यास येत असताना,त्यांना फिर्यादी यांनी अडविले असता,त्यांनी तो बांबु फिर्यादी यांचे डोक्यात व उजव्या पायास मारल्याने त्यांना दुखापत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, वणवे ८९८३६०४६१३ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६६४/२०२३,भादविक ३८१,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४३ वर्षे,रा.उंड्री,पुणे |
| **आरोपीत** | दोन कामगार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०६/२०२३ रोजी रात्री २३/३० ते दिनांक ०१/०७/२०२३ रोजी दुपारी १४/३० वा.चे दरम्यान पृथ्वीराज वेअर हाऊस,शॉप नं.२,जगदंबा भवन मार्ग,पिसोळी,पुणे येथे असलेल्या मंगल ट्रेडींग कंपनीचे कोल्ड्रींगचे गोडावुन मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा कोल्ड्रींगचा होलसेल विक्रीचा व्यवसाय आहे. यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे कोलड्रींगचे गोडावुन मध्ये कामगार म्हणुन काम करीत असताना,त्यांनी आपसात संगनमत करून,सदर कोलड्रींगचे मधुन व ऑफिस मधुन कोल्ड्रींग विक्रीमधुन आलेले ४,८०,०००/- रुपये रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकुण ०४,८५,०००/- रुपये किंमतीचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय वगरे ७७२२०११२४५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**